बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

मूल्य २.००

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२४२ ■ शुक्रवार १३ जून २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.No./DHL/53/24-26


घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# अहमदाबादेत प्रवाशी विमान कोसळले; २४५ हून अधिक ठार

## मृत प्रवाशांमध्ये १६९ भारतीय, ५१ ब्रिटीश, ७ पोर्तूगीज, एक कॅनेडियन नागरिकाचा समावेश

**अहमदाबाद, दि. १२ : गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघाताने देश हादरला आहे. अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन लंडनला निघालेल्या विमानाला उड्डाणानंतर अवघ्या सहा मिनिटांत अपघात झाला. या विमानात २४२ जण होते. त्यात दोन पायलट आणि १० विमान कर्मचारी होते. विमान अपघाताची भीषणता पाहता विमानातील सर्व २४२ जण या अपघातात ठार झाल्याची माहिती पोलिसांनी वृत्तसंस्थांना दिली आहे. उड्डाण करणाऱ्या विमानात मोठा इंधन साठा असल्याने अपघाताची भीषणता भयावह आहे.**





### देवतारी त्याला कोण मारी



अहमदाबादच्या विमान दुर्घटनेत ए-११ या सीटवरून प्रवास करणारा प्रवासी आश्चर्यकारकपणे बचावला असल्याची माहिती पुढे आली आहे. विमान कोसळले तेव्हा ४१५ फूटावरून चाळीस वर्षीय रमेश विश्वकुमार हे बाहेर फेकले गेले आणि ते जमिनीवर पडल्याचे सांगण्यात येते. मुळचे भारतीय पण ब्रिटीश नागरिकत्व घेतलेल्या रमेश विश्वकुमार यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात येते. या घटनेत रमेश विश्वकुमार यांच्या छाती, पाय आणि डोळ्यांजवळ काही प्रमाणात इजा झाली आहे. विमानाने उड्डाण घेतल्यानंतर काही वेळाने मोठ्ठा आवाज झाला आणि विमान कोसळले, असे रमेश विश्वकुमार यांनी घटनास्थळी काहींना सांगितले. पोलिस आयुक्त जी. एस. मलिक यांनी सांगितले की, रमेश विश्वकुमार हे उपचार घेत आहे. त्यांच्याकडूनच विमानअपघाताची माहिती मिळू शकेल.

अहमदाबाद येथील मेघानीनगर येथे हे विमान कोसळले. एअर इंडिया-१७१ असे या दुर्घटनाग्रस्त विमानाचे नाव आहे. या विमान अपघाताने संपूर्ण देश हादरला आहे. अपघातग्रस्त विमान ११ वर्षे जुने आहे. गुरुवारी दुपारी दीडला विमानाने उड्डाण घेतले. अवकाशातील छायाचित्रानुसार दुपारी एक वाजून ३८ मिनिटांनी विमान धावपट्टीच्या शेवटच्या भागात होते. टेक-ऑफ नंतरच्या काही मिनिटांनी विमान समुद्र सपाटीपासून ६२५ फुटांवर होते. टेक-ऑफ केल्यानंतर पायलटने अपातकालीन संदेश पाठवला होता. या विमानाने अहमदाबाद विमानतळावरुन रन-वे क्रमांक २३ वरुन दुपारी एक वाजून २३ मिनिटांनी आकाशात झेप घेतली. पण, त्यानंतर विमानाशी संपर्क होऊ शकला नाही. प्रशासन काही मदत करणार त्याआधीच विमान कोसळले. या विमानाचे पायलट कॅप्टन सुमीत सभरवाला यांना ८ हजार २०० तास विमान उड्डाणाचा अनुभव आहे. विमानतळ समुद्र सपाटीपासून २०० फूट उंचीवर आहे. याचा अर्थ विमान

भारतातील आतापर्यंतचे १० सर्वात भयंकर विमान अपघात : पान ४ वर

विमानतळापासून ४०० फूट उंचावर होते. टेक-ऑफ नंतर विमानाची सिग्नल यंत्रणा सक्रिय होती. प्रशासनाच्या माहितीनुसार एक वाजून ४० मिनिटांनी विमान कोसळले.

**तीन सेकंदांची शांतता आणि मोठ्ठा स्फोट**

चारशे फूट प्रति मिनिट वेगाने विमान खाली कोसळत होंते. त्यामुळे पायलटकडे काहीही करण्यासाठी अवघा एक मिनिट होता. इतक्या कमी कालावधीत विमानाचा अपघात टाळण्याची शक्यता अतिशय कमी होती. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, विमान समुद्र सपाटीपासून ६२५ फूट उंचीवर होतं. विमान ३५ हजार फूट उंचीवर असते, तर विमान कर्मचाऱ्यांना स्थिती सांभाळण्यासाठी अधिक वेळ मिळाला असता. त्यामुळे अनेकांचे जीव वाचले असते. पण अपघात टेक-ऑफ नंतर अवघ्या काही मिनिटांत झाल्याने ते कमी उंचीवर होते. त्यामुळे पायलटकडे दुर्घटना टाळण्यासाठी अत्यंत कमी वेळ होता.

विमानातील वजनाच्या संदर्भातील आकडेमोड चुकीची हाती आल्याने दुर्घटना घडली असावी, असा अंदाज उड्डाण तज्ज्ञ डॉ. वंदना सिंह यांनी वर्तवला. लँडिंग गियर नीट बंद झाला नाही. कारण एक चाक इमारतीत अडकलेले दिसत आहे. याचा अर्थ संतुलनात निर्माण झालेल्या समस्येमुळे हा अपघात झाला, असे सिंह यांनी सांगितलं. अपघातानंतर विमानात प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांची यादी समोर आली आहे.

या अपघातग्रस्त विमानात एकूण २४२ प्रवासी होते. यामध्ये २ पायलट, १० (पान ४ वर)

### धूळ, धूर अन् राख यांच्यात जीवन-मरणाची लढाई..!

**अहमदाबाद, दि.१२- गुजरातमधील अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये विमान क्रॅश होताच तेथील परिसरात निघणारा धूर आणि जमिनीवर पसरलेले विमानाचे फोटो हे देखील खूपच भयावह आहेत. या विमानात एकूण २४२ प्रवासी होते. ज्यामध्ये २ पायलट आणि १० केबिन क्रू यांचा समावेश आहे.**

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये सर्वत्र धूळ, धूर आणि राख पसरलेली दिसत आहे. ज्या ठिकाणी विमान क्रॅश झाले त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात बचावकार्य सुरु आहे. या ठिकाणी रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. या घटनेतील जखमींना लगेच रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. त्याचबरोबर आकाशात मोठ्या प्रमाणात धूर झाल्याचे दिसत आहे.

**युद्धपातळीवर बचावकार्य सुरु**

घटनास्थळी एसडीआरएफ पोलीस, एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत. मोठ्या ताकदीने बचावकार्य सुरु आहे. रुग्णवाहिकेचे सायरन आणि अग्निशमन दलाच्या गाड्या पाहून तेथील प्रत्येक सेकंद मौल्यवान असल्याचं दिसत आहे. युद्धपातळीवर जखमींना तेथील आसपासच्या रुग्णालयात दाखल करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्यासोबत अनेक लोक या अपघातात मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. अशातच आता सोशल मीडियावर या अपघातानंतरचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये तेथील आजूबाजूचा परिसर देखील दिसत आहे. ज्यामध्ये सर्व ठिकाणी धूळ आणि धूर पसरलेला दिसत आहे. सध्या या ठिकाणी बचाव पथक हे अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहे.



या घटनेत जखमी झालेल्या लोकांना वाचवण्यासाठी अनेक जण मदत करताना दिसत आहेत.

### ढंडाणेत दरोडेखोरांची सुपरवायझरला मारहाण

नंदुरबार, दि.१२ (प्रतिनिधी)- तालुक्यातील ढंडाणे शिवारात दहा जून रोजी रात्री दिड वाजेच्या सुमारास आठ ते दहा दरोडेखोरांनी सुपरवायझला हाताबुक्यांनी मारहाण करीत त्यांच्या खिशातील ३५० रुपये हिसकावून घेत सुजलॉन कंपनीच्या टॉवरमधून ऑईल चोरी करण्याचा प्रयत्न केला. या मारहाणीत सुदैवाने वाचले असून दरोडेखोरांनी दुचाकी लंपास केली आहे. या प्रकरणी नंदुरबार तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व दरोडेखोर हे तीस ते पसतीस वयोगटातील असल्याचे सांगण्यात येत आहे. मध्यरात्रीनंतर आलेल्या या दरोडेखोरांकडे (पान ४ वर)

### धुळ्याहून मुंबई-पुण्यासाठी रोज एसी कोचसह रेल्वेसेवा
### आ.अग्रवाल यांना मध्यरेल्वे व्यवस्थापकांचे आश्वासन

**धुळे, दि.१२- धुळे शहरासह जिल्ह्यातील प्रवाशांसाठी धुळे येथून मुंबई व पुण्यासाठी रोज रात्री एसी कोचसह रेल्वेसेवा सुरू करण्यासह मुंबई व पुण्याहूनही रोज रात्री धुळ्यासाठी एसी कोचसह रेल्वेसेवा लवकरच सुरू करण्याचे आश्वासन सेंट्रल रेल्वेचे सरव्यवस्थापक धर्मवीर मीना यांनी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांना आज दिले.**



आमदार अग्रवाल यांनी आज मुंबई येथे सेंट्रल रेल्वेचे सरव्यवस्थापक धर्मवीर मीना, रेल्वेचे प्राधान्य मुख्य अभियंता रजनीश माथूर, पीसीओएम एस. एस. गुप्ता, पीसीसीएम अरविंद मालखेडे, सीपीआरओ स्वप्नील नीला, उपसरव्यवस्थापक के. के. मिश्रा आदी अधिकाऱ्यांची भेट घेत त्यांच्याशी धुळे शहराच्या रेल्वेशी संबंधित विविष विषयांवर चर्चा करत मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी सरव्यवस्थापक मीना यांनी आमदार अग्रवाल यांनी केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करत त्या तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. (पान ४ वर)

### दुचाकींची धडक युवक जागीच ठार

नंदुरबार, दि.१२ (प्रतिनिधी)- मोहीदाजवळ रस्त्याजवळ दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने अपघातात मक्कनसिंग मोतीसिंग पवार हा ३६ वर्षीय युवक ठार झाला. यानंतर धांदेर खुर्दे ता.शहादा गावात शोककळा पसरली. या प्रकरणी मोटारसायकल चालक जितेंद्र सोमा कोळी रा.मोहिदा याच्या विरोधात शहादा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जितेंद्र कोळी याने मोटारसायकल क्रमांक एमएच ३९ एएच ५२९५ ही दुचाकी भरधाव नेली. यात समोरुन आलेल्या मोटारसायकल क्रमांक एमएच ३९ एएम ०९८६ वरील चालक मक्कनसिंग मोतीसिंग हा ठार झाला. पोनि निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहेत.

### धुळे मनपा निवडणूक प्रक्रियेस प्रशासनाकडून प्रारंभ
### एक सप्टेंबरला अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार

**धुळे, दि.१२- धुळे महापालिकेच्या निवडणुक प्रक्रियेला प्रशासनाने सुरूवात केली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालखंडात निवडणुक आयुक्तांकडून प्रभागांची अंतिम रचना अधिसुचनेतुन प्रसिध्द केली जाईल. त्यानंतर निवडणुक कार्यक्रम जाहीर होवु शकेल, अशी माहिती महापालिका**



**आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी दिली. प्रशासनाच्या या तयारीमुळे राजकीय पक्ष आणि संभाव्य उमेदवारांच्या हालचालींना वेग येणार आहे.**

निवडणूक आयुक्तांकडून राज्यातील ड वर्गातील महापालिकांच्या प्रभाग रचनेचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. यामुळे एका अर्थाने महापालिकेच्या निवडणुक प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार ११ ते १६ जुन या कालावधीत प्रगणक गटाची मांडणी (पान ४ वर)



### हिरे महाविद्यालयाच्या रूग्णालयात अपमानास्पद वागणुकीची तक्रार

**धुळे, दि.१२-भाउसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविदयालयाच्या रूग्णालयात काही डॉक्टर आणि कर्मचारी रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी असभ्य वर्तन करतात. कर्मचाऱ्यांचे हे कारणामे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीत झाले आहेत. त्याची तपासणी करावी आणि दोषी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर सक्त कारवाई करावी, अशी मागणी मुस्लिम ओबीसी, एसबीसी संघर्ष समितीने केली आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांना अधिष्ठात्यांना याबाबत सविस्तर निवेदन दिले.**

भाउसाहेब हिरे शासकीय वैदयकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात अनेक कष्टकरी उपचार घेतात. या रूग्णालयात काही कर्मचारी चांगले वर्तन करतात. तर काही कर्मचारी रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांचा अपमान करतात. प्रसंगी शिवीगाळ करतात. याबाबत काही नागरीकांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या पण दखल (पान ४ वर)

### मालनगाव धरणात बुडून एकाचा मृत्यू

धुळे, दि.१२- साक्री तालुक्यातील मालनगाव धरणात बुडाल्याने पस्तीस वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. चुनिलाल उत्तम मोरे (वय ३५)रा.नवागाव पो.शिरसोले ता.साक्री हे दि.११ जून रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास मालनगाव धरणात मासे पकडण्यासाठी गेला. धरणाच्या किनाऱ्यावर चुनिलालचे कपडे, चप्पल आढळून आली. या ठिकाणी पट्टीच्या पोहणाऱ्यांना पाचारण करण्यात आले. धरणाच्या पाण्यात शोध घेतला असता चुनिलाल बुडालेल्या स्थितीत आढळून आला. खाजगी वाहनातुन पिंपळनेर ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉ.पाटील यांनी तपासून मयत घोषित केले.

### धुळ्यात अतिसाराची लागण झालेले रूग्ण वाढलेत, तरूणाचा मृत्यू

**धुळे, दि.१२- शहरात अतिसाराची लागण झाली आहे. त्यात कुमारनगरमध्ये राहणाऱ्या मोहनलाल सबनानी या ३४ वर्षीय तरूणाचा मृत्यु झाला आहे. जिल्हा रूग्णालयात ३० पेक्षा अधिक रूग्ण उपचार घेत आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून अतिसाराची लागण झालेल्या भागात नागरीकांच्या आरोग्याची तपासणी केली जात आहे, अशी माहिती आरोग्य अधिकारी संपदा कुलकर्णी यांनी दिली.**

धुळे शहरात गेल्या काही दिवसांपासुन अतिसाराची लागण झाली आहे. दुषित पाणी पुरवठयामुळे आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अतिसाराची लागण झाल्यामुळे कुमारनगरमधील मोहनलाल सबनानी या तरूणाचा मृत्यु झाला आहे. गेल्या आठवडयात शहराच्या निरनिराळया भागात अतिसाराची लागण झालेले ९० रूग्ण आढळले. जिल्हा रूग्णालयात ३० पेक्षा अधिक रूग्ण उपचार घेत आहेत. शहरातील कुमारनगर, मोगलाई, शनीनगर, भीमनगर या भागातील नागरीकांना अतिसाराची लागण झाली आहे. सतत जुलाब होणे, उलटया होणे यामुळे नागरीक अशक्त झाले आहेत. (पान ४ वर)

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली गडचिरोलीत शेतकरी न्याय पदयात्रा

**गडचिरोली, दि.१२- नरेंद्र मोदी हे ११ वर्षापासून पंतप्रधानपदावर आहेत पण ११ वर्षात त्यांनी जनतेल्या दिलेल्या आश्वासनातील एकही आश्वासन पूर्ण केलेले नाही. मोदी व फडणवीस जे बोलतात ते कधीच करत नाहीत. स्वत:ला फकीर म्हणवणारे नरेंद्र मोदी लाखो रुपये किंमतीची जॅकेट्स, लाखो रुपयांचे कपडे वापरतात, महागड्या वस्तू वापरतात, ते योगी नाही तर सत्ताभोगी असून जनतेला दिलेली वचने पूर्ण न करणारे अधर्मी आहेत, असा घणा घाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.**





विधानसभा निवडणुकीतील मतचोरीची चौकशी करावी यासाठी काँग्रेस पक्षाने आजपासून राज्यभर मशाल मोर्चे काढण्याचे निश्चित केले होते. आज गडचिरोलीत प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली मशाल मोर्चा व शेतकरी न्याय पदयात्रा काढण्यात आली. यावेळी विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, खासदार नामदेव किरसान, खासदार प्रतिभाताई धानोरकर, एआयसीसीचे सचिव व सहप्रभारी कुणाल चौधरी माजी मंत्री अनिस अहमद, आमदार अभिजित वंजारी, माजी आमदार सुभाष धोटे, गडचिरोली काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, आपण सतत गडचिरोलीचा दौरा करतो असा टेंभा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मिरवत असतात पण ते गडचिरोलीच्या विकासासाठी नाही तर सुरजागडच्या लोह खाणीतून मिळणाऱ्या मलईतून स्वतःच्या तुंबड्या भरण्यासाठी येतात. स्टील सीटी करण्याच्या नावाखाली गडचिरोलीतील शेतकरी, आदिवासी, शेतमजूर, स्थानिकांवर सुरा फिरवत आहेत. फडणवीस यांना गडचिरोलाचे फडणवीसस्थान करायचे आहे. सुरजागडच्या (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -89,950 रु.+3% GST
सोने- 24 K -98,200 रु.+3% GST
चांदी- 1,10,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

विनम्र अभिवादन



आमचे प्रेरणास्थान
स्व.दाजीसाहेब रोहिदासजी पाटील
यांना जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन!

मार्गदर्शक

आ.कुणालबाबा पाटील

स्व.दाजीसो.रोहिदासजी पाटील
(माजी मंत्री)

विनम्र अभिवादन

श्रद्धावनत्




डॉ.सदाशिव श्रीराम सुर्यवंशी, चेअरमन


हेमंत यादवराव वाघ, व्हा.चेअरमन


प्रा.विजय वसंतराव देसले संचालक


डॉ.जितेंद्र सुभाष भामरे संचालक


प्रविणकुमार तुकाराम लाडे संचालक


मनोज पोपटराव पाटील संचालक


सोमनाथ हिरामण पाटील संचालक


विशाल सुधाकर ठाकरे संचालक


डॉ.क्रांती शशिकांत पाटील संचालिका


प्रा.कल्पना नारायण रवंदळे संचालिका


शांताराम दगडू लोंढे संचालक


अनिल शरदचंद्र राऊत स्वि.संचालक


संजय रघुनाथ आव्हाड स्वि.संचालक

✻ कर्मचारी वृंद ✻
नितीन शिवाजी बेडसे
मोतिलाल दादाजी साळवे
योगेश उत्तमराव चव्हाण
सतिष नामदेव पाटील

पतपेढीचे सर्व सभासद बंधू व भगिनी
श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या पगारी सेवकांची
डॉ. नानासाहेब विश्वासराव पाटील सहकारी पतसंस्था मर्या. धुळे

# आपला महाराष्ट्र

## शरदराव पवारांची खंत वास्तववादी

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरदराव पवार यांनी सांगलीत बोलताना पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारी बाबत खंत व्यक्त केली. ती अत्यंत वास्तववादी म्हणावी लागेल. परंतु त्यांनी पश्चिम महाराष्ट्र सहकार ऐवजी खाजगी कारखानदारीकडे वळल्याचे सांगितले असले तरी एकूणच महाराष्ट्रात तशी अवस्था निर्माण झाली आहे. विदर्भ असो, मराठवाडा असो, की उत्तर महाराष्ट्र असो सगळीकडे सहकारी कारखानदारीची प्रचंड पडझड झालेली आहे. त्या जागेवर सर्वत्र खाजगी कारखानदारी उभी आहे. सहकारी कारखानदारी राजकीय क्षेत्रातील ज्या दिग्गजांनी उभी केली होती. त्यांनी आणि त्यांच्या वारसदारांनी मोडीत काढली असून ती कब्जात घेतली आहे. याचा अर्थ पूर्व सुरींनीआपल्या वारसदारांना सहकाराचे महत्व पटवून दिलेले नाही. अथवा त्यांना संस्कारित केले नाही. शिवाय त्या वारसदारांचा प्रवेश राजकारणात झाला तेव्हा खाजगी आणि सार्वजनिक जीवनात जी नीतिमत्ता लागते तिला नव्या पिढीने हरताळ फासला, आर्थिक गैर व्यवहार केले. ते इतके केले की आधीच्या पिढीलाही त्यांनी पार केले. त्याविरुद्ध चौकशा होऊ नयेत किंवा कायदेशीर कारवाई होऊ नये म्हणून ते पटापट शासक पक्षाच्या गळाला लागले. पक्षात आणि सत्तेत सहभागी झाले. थोडक्यात ईडी, आयकर, सीबीआय च्या भितीमुळे ते गर्भगळीत होऊन त्यांनी धर्मांधतेचा मार्ग स्वीकारला. ते करीत असताना सहकाराला सोडचिठ्ठी दिली. सहकारी कारखानदारी चे दिवाळे काढले. सरकारने ते ताब्यात घेतले. काही कारखाने बँकांनी ताब्यात घेतले, वित्तीय संस्थांनी त्यांचे लीलाव काढले. आणि सत्तेत असलेल्याच नव नेतृत्वाला विकले. ते अतिशय मातीमोल किमतीत विकले. राजकीय नेत्यानी ते विकत घेतले. त्यातही सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांचा मोठा अंतर्भाव आहे. त्याने ते विकत घेऊन चालविले आणि नफ्यात आणले. ते नव श्रीमंत झाले. तो पैसा त्यांनी राजकारणात आणला. आणि सत्तेची मांड पक्की केली. या संदर्भात धुळे येथील किसान सहकारी स्टार्च मॅन्युफॅक्चरिंग सोसायटीचे उदाहरण बोलके म्हणावे लागेल. या प्रकल्पात सुमारे ७५ हजार आदिवासी सभासद होते. ७५००० बिगर आदिवासी सभासद होते. भरपूर मका पिकत होता. त्याला भाव मिळत होता. जे कर्ज होते ते स्थानिक बँकांकडून घेतलेले नव्हते तर राष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून घेतलेले होते. वर्किंग कॅपिटल साठी राज्य सहकारी बँकेकडून तेरा कोटी रुपये घेतले होते. कारखाना चालू होण्यापूर्वी ते घेतले असल्याकारणाने त्यांचा उपयोग झाला नाही म्हणून आठ कोटी रुपये परत केले. उर्वरित पाच कोटी देणे बाकी होते. परंतु राज्य सहकारी बँकेने या रकमेवर एवढे व्याज लावले की ती रक्कम ६५ कोटी वर नेली. कायदेशीर रित्या ही बाब चुकीची असली तरी राज्य सहकारी बँकेच्या नेतृत्वाने हा कारखाना ताब्यात घेतला. नेतृत्व अर्थात अजित पवार यांच्याकडे होते. किसान फॅक्टरी चे संस्थापक त्यांचे विरोधक होते. त्याचा वचपा काढताना हा प्रकल्प माती मोल किमतीत विकण्यात आला. अवघ्या १९ कोटी रुपयात प्रचंड मोठा कारखाना इथल्याच लोकांनी घेतला. त्यात एक कारखानदार इचलकरंजीचा भागीदार होता. नंतर त्याने स्वतःच तो घेतला. आणि बंद झाला. लाखो शेतकऱ्यांचे शेअर भांडवल गेले. अनेकांचा रोजगार गेला. राजकीय सूडापोटी या प्रकल्पावर संबंधितांनी घाला घातला. अशाप्रकारे महाराष्ट्रातील अनेक प्रकल्पांची गत झाली आहे. त्यातूनच पश्चिम महाराष्ट्रातील कारखानदारी खाजगी कारखानदारीकडे गेली. ज्येष्ठ नेते शरदराव पवार याबाबत सांगलीत बोलले ते योग्यच बोलले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी सहकार क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केलेली आहे. मात्र त्यांच्या नंतरची पिढी सहकाराचा हात सोडून खाजगी कारखानदारीकडे वळली अशी त्यांची खंत आहे. खरोखरच सहकारी कारखानदारी बाबत पश्चिम महाराष्ट्राने संपूर्ण देशाला आणि राज्याला योग्य ते मार्गदर्शन केलेले आहे. एक आदर्श घालून दिला आहे. पश्चिम महाराष्ट्र सहकारात अतिशय अग्रणी होता त्याच नेत्यांची पुढची पिढी मात्र भ्रष्ट निघाली. सहकारात नवे काही निर्माण करण्या ऐवजी प्रत्येकाने खाजगी कारखानदारी सुरू केली याबद्दल पवार साहेबांच्या मनात खंत आहे.

नगरमध्ये लोणी येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रथमतः अर्थतज्ज्ञ डॉक्टर धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली सहकारी साखर कारखाना काढला. डॉक्टर धनंजयराव गाडगीळ तब्बल अकरा वर्षे या कारखान्याचे चेअरमन होते. त्यांनी नगर जिल्हा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि समृद्ध करून दाखवला आणि सहकार क्षेत्रातून त्याची पायाभरणी केली. विखे पाटील धोतर आणि पगडी धारक होते. ६१–६२ चा जोडा ते वापरत असत. कारखान्यात रसोडा होता तो बाहेरून आलेल्या पाहुण्यांसाठी आणि तांत्रिक दृष्ट्या काम करणाऱ्या लोकांसाठी होता. ते स्वतः घरून भाकरी बांधून आणत असत. भोजनाची वेळ झाली की, कोटाच्या खिशातून भाकरी बाहेर काढून ते भोजन करीत असत. थोडक्यात कारखान्याचे काहीच खायचे नाही असा त्यांचा दंडक होता. म्हणून त्यांना त्या काळी पद्मश्री मिळाली. म्हणूनच जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनी कारखान्याची धुरा सांभाळली. काळाचा महिमा असा की आज त्यांची तिसरी पिढी, सहकार क्षेत्रात आहे आणि त्यांनी दीर्घकाळ सत्ते सोबत राहून तडजोडी स्वीकारल्या. आज ते मंत्रीपदी आहेत आणि धर्मांध विचारसरणीच्या लोकांसोबत त्यांनी हात मिळवणी केली आहे. त्यांची कारखानदारी त्यामुळे शाबूत राहू शकली. अन्यथा ती सुद्धा खाजगीकरणात गेली असती. मराठवाड्यातील बहुतेक कारखानदारी खाजगी आहे. अनेक कारखाने मुंडे परिवाराने चालवायला घेतले आहेत. ते यशस्वी आ–हेत. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. साखर कारखाने, खाजगीकरणात गेले तशा सुतगिरण्या देखील गेल्या आहेत. सहकारी दूध संघांची तर केव्हाच वाट लागली आहे. इतर जे काही सहकारी प्रकल्प होते ते केव्हाच संपले. धुळे येथील एमआयडीसी मध्ये मोठा तेल प्रकल्प सहकारी तत्त्वावर फेडरेशनने उभा केला होता. अवघ्या काही वर्षातच त्याचे दिवाळे निघाले आणि तो प्रकल्प मोडीत निघाला. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. त्याबद्दलची सर्व माहिती शरदराव पवारांना आहे. ते या घडामोडींचे साक्षीदार आहेत. त्यामुळे त्यांनी अशी खंत व्यक्त केली आहे. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात सहकाराला प्रोत्साहन दिले. त्यानंतर वसंतदादा पाटील यांनी सहकार चळवळ पुढे नेली. त्यांच्या पाठोपाठ शरदराव पवारांनी या चळवळीचे नेतृत्व दीर्घकाळ केले. ते मुख्यमंत्री असताना आणि केंद्रात कृषी मंत्री असताना सहकारी क्षेत्रातील अनेकांना त्यांनी मदत केली हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. परंतु त्यांच्या डोळ्यादेखतच या क्षेत्राची धुळधाण झाली ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल.

धुळे जिल्ह्यात आणि नंदुरबार ,जळगाव जिल्ह्यात संपूर्ण साखर कारखानदारी आणि सूतगिरण्या तोट्यात जाऊन. मातीमोलश किमतीत विकल्या गेल्या. त्या सर्व खाजगी कारखानदारीकडे गेल्या आणि त्यांनी ते प्रकल्प यशस्वीरित्या चालविले आहेत. नंदुरबारचा पुष्पदंतेश्वर सहकारी साखर कारखाना अजित पवार यांच्या कंपनीने विकत घेतला. कन्नड चा कारखाना त्यांनीच विकत घेतला. नवल नगरचा संजय साखर कारखाना अवघ्या अकरा बारा कोटी रुपयात राजेश टोपे यांनी घेतला. (पान ३ वर)

## कपाशीच्या क्षेत्रात निंदणी सुरू महिला मजूरांना रोजगार संधी

**धुळे, दि.१२- मे महिन्यात लागवड केलेल्या कपाशीच्या क्षेत्रात कोळपणी आणि निंदणी होत आहे. कोळपणी आणि निंदणी झाल्यानंतर पिकांना रासायनिक खतांची मात्रा देणे शक्य होईल. त्यानंतर पिकांची जोमाने वाढ होईल, अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. सध्या धुळे तालुक्यातील सावळदे शिवारात कपाशीच्या क्षेत्रातील तण काढून बांधाबाहेर टाकले जात आहे. या कामामुळे महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.**

धुळे जिल्हयात खरीपाचे सुमारे सव्वाचार लाख हेक्टर क्षेत्र आहे. यापैकी दोन लाख हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली जाते. सहाजिकच मे महिन्यात अनुभवी शेतकऱ्यांनी विहीरींचा पाण्याचा अंदाज घेत कपाशीची लागवड केली. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात लागवड केलेली कपाशीचे रोपटे आता एक महिन्याचे झाले आहेत. साहजिकच कपाशीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात तण वाढले आहे. शेतकऱ्यांकडून महिला मजुरांच्या मदतीने तण बांधाबाहेर काढले जात आहे. धुळे तालुक्यातील सावळदे परिसरात कपाशीची कोळपणी केल्यानंतर निंदणी केली जात आहे. यावेळी शेतकरी अनिल पाटील म्हणाले, कोळपणी आणि निंदणीच्या कामामुळे पिकांची वाढ होण्यास मदत होते. त्यानंतर काही दिवसांनी रासायनिक खतांची मात्रा देण्यात येईल. खतांची मात्रा दिल्यानंतर पिकांची जोमाने वाढ होण्यास मदत होईल, असेही शेतकरी अनिल पाटील यांनी सांगितले.

धुळे जिल्हयातील बहुसंख्य शेती कोरडवाहू आहे. बहुसंख्य शेतकरी पावसाच्या भरवशावर शेती कसतात. यंदा हवामान खात्याने सरासरीच्या तुलनेत जास्तीचा पाऊस होईल, असा अंदाज व्यक्त केला होता. चौदा जुन नंतर पाऊस सक्रीय होईल, असेही हवामान खात्याचे म्हणणे आहे. साहजिकच पेरणी योग्य पाऊस झाल्याशिवाय कोणीही पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. चौदा जुन नंतर पाऊस झाला तर उर्वरीत क्षेत्रात मका, ज्वारी, बाजरी या पिकांची पेरणी होईल. अपेक्षित पाऊस झाला तर उत्पन्न चांगले येईल, असा आशावादही शेतकऱ्यांना आहे.



## साक्री आगारात कामगार, प्रवाशी दिन साजरा

**साक्री, दि.१२ (प्रतिनिधी)- साक्री आगारात कामगार व प्रवाशी दिवस निमित्ताने विभाग नियंत्रक विजय गीते, विभागीय वाहतुक अधिक्षक देवराज, विभागीय संख्यिकी अधिकारी सुरज माळी यांच्या उपस्थितीत प्रवासी दिन साजरा झाला.**

साक्री आगारात प्रशासनाच्या वतीने आगार व्यवस्थापक साक्री सुनिल महाले, कार्यशाळा प्रमुख योगेश शिंगाणे, वाहतुक निरिक्षक पी.के.अहिरे, साहाय्यक वाहतुक अधिक्षक दिलीप भामरे, वरिष्ठ लिपीक राहुल साळुंखे हे आजच्या प्रवाशी राजा दिन व कामगार दिन साजरा करण्यासाठि उपस्थीत होते यावेळी मा विभाग नियंत्रक यांनी प्रवाशी व कामगारांच्या अडिअडचणी जाणुन घेतल्या तसेच कामगारांच्या अडीअडचणी जाणून त्यांना योग्य तो न्याय देण्याचे अश्वासीत केले. तसेच महाराष्ट्र एसटी वर्कर्स इटंक युनियन व इटंकच्या वतीने प्रकाश शिंदे, प्रविणकुमार साळवे, योगेश देवरे, नाजीम पिजांरा, खलील पिजांरा हिंमत सोनवणे, सुनील हेमाडे, नाजीम पिजांरा, विशाल सरग यांनी केला. तसेच विभाग नियंत्रक यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले की, आपल्या सर्वांच्या परिश्रमामुळेच धुळे विभाग व साक्री आगार राज्यात सर्व बाबींमध्ये सन २०२४ ते २५ कालावधीत प्रथम येवू शकला हे सर्व कामगारांचे सांघिक यश आहे. आपल्या कामगीरी ची दखल घेवुनच परिवहन मंत्री व मध्यवर्ती कार्यालय प्रशासनाने संपूर्ण राज्यात धुळे व नंदुरबार जिल्हा व्यवस्थापन पॅटर्न राबविण्याचे घोषित केले व आपल्या कामगीरी मुळेच आम्हाला प्रतिनिधित्व करण्याची संधी मुबंई येथे मिळाली हे नाकारून चालणार नाही म्हणुन सत्काराचे खरे मानकरी एसटि कामगार आहेत म्हणुन विभाग नियंत्रक विजय गिते यांनी चालक वाहक यांत्रीक व कामगार बांधवांचा सत्कार केला. महाराष्ट्र एसटि वर्कर्स इटंक संघटना साक्री आगार सघंटनेचे साक्रि आगाराचे अध्यक्ष वैभव सोनवणे, राज्य कार्यकारिणी सदस्य महेश भदाणे, दिनेश नेरकर, भास्कर शेवाळे, सुनिल हेमाडे आदि कामगार उपस्थित होते.

## वटसावित्री पौर्णिमेनिमित्त एकवीरेला ३५१ किलो आंब्यांचा भोग समर्पित

**धुळे, दि.१२- संसर्गजन्य आजार समुळ नष्ट व्हावे, कोणतेही आरिष्ट येऊ नये, असे साकडे महिलांनी एकवीरा देवीस घातले. वटसावित्री पौर्णिमेनिमित्त खानदेश कुलस्वामिनी एकवीरा देवीस ३५१ किलो आंब्यांचा नैवेदय दाखविण्यात आला. यावेळी मंदिर परिसरातुन पालखी मिरवणुक काढण्यात आली. आमदार अनुप अग्रवाल यांच्या पत्नी अल्पा अग्रवाल यांच्या हस्ते पालखीचे पुजन झाले. तसेच धुळे शहरातील मालेगाव रोड परिसरात तृतीयपंथीयांनी वटसावित्री पौर्णिमा साजरी केली.**

खानदेश कुलस्वामिनी एकवीरा देवी मंदिरात वटसावित्री पौर्णिमेनिमित्त कार्यक्रम झाला. देवीला ३५१ किलो आंब्यांचा नैवेदय दाखविण्यात आला. तसेच पुरणपोळ्यांचा महाप्रसादही देवीला दाखवण्यात आला. त्यानंतर मंदिर परिसरातुन पालखी मिरवणूक काढण्यात आली. पालखीचे पुजन आमदार अनुप अग्रवाल यांच्या पत्नी अल्पा अग्रवाल, माजी महापौर प्रतिभा चौधरी आणि माजी महापौर चंद्रकांत सोनार यांच्या हस्ते झाले. यावेळी महिलांच्या हस्ते देवीची पुजा आणि आरती झाली. मंदिराचे विश्वस्त सोमनाथ गुरव म्हणाले, वटपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर आई एकवीरा देवीच्या दर्शनासाठी खानदेशातील बहुसंख्य भाविक आले. आंब्याची रास आणि पुरणपोळ्यांचा नैवेद्य हे या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. यानिमित्ताने महिलांनी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि कुटुंबाच्या सुखासाठी देवीकडे प्रार्थना केली. साहजिकच सर्वत्र भक्तिमय वातावरणाची निर्मिती झाली होती.

**तृतीयपंथीयांची गुरूसाठी प्रार्थना**

धुळे शहरातील मालेगावरोड परिसरात तृतीयपंथीयांनी वटसावित्री पौर्णिमा साजरी केली. पतीच्या दीर्घायुष्यासाठी सावित्रीने केलेल्या त्यागाचे स्मरण करत, तृतीयपंथी समाज बांधवांनी आपल्या गुरूंच्या दीर्घायुष्यासाठी आणि जगाच्या कल्याणासाठी वडाच्या वृक्षाची विधिवत पूजा केली. वटसावित्री पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे. पतीच्या दीर्घायुष्यासाठी पत्नी ही पुजा करते. या दिवशी सावित्रीने यमाकडून आपला पती सत्यवानाचे प्राण परत आणले, अशी आख्यायिका आहे. याच धर्तीवर, मालेगाव रोड परिसरातील तृतीयपंथींनी आपल्या गुरूंच्या प्रती असलेली निष्ठा आणि आदर व्यक्त केला. ज्याप्रमाणे सावित्रीने व्रत करून आपल्या पतीचे प्राण परत आणले, त्याचप्रमाणे आमच्या गुरूंना दीर्घायुष्य लाभो, सात जन्म हाच गुरु आम्हाला लाभो आणि या जगाचे कल्याण होवो, अशी मनोकामना केली. याप्रसंगी तृतीयपंथीयांनी पारंपरिक वेशभूषा करून वडाच्या झाडाभोवती फेऱ्या मारल्या आणि पुजा केली.

## श्रीकृष्ण प्रणामी मंदिरात आठवा वार्षिक महोत्सव

**सोनगीर दि.१२ (प्रतिनिधी)- ब्रह्मलीन परमहंस श्री कांतादासजी महाराज (फूलपूर भैया) यांची समाधी तसेच ब्रह्मलीन परमहंस दाद-ागुरु श्री राजनारायणदासजी महाराज यांची कर्मभूमी आणि ब्रह्मलीन परमहंस सतगुरु श्री रामरतनदासजी महाराज यांची दीक्षा व तपोभूमी असलेले त्रिवेणी-संगम-स्वरूप श्री कृष्ण प्रणामी मन्दिर सोनगीर धाम येथे ८ वां वार्षिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात श्री मुखवाणीचे ३१ पारायण होणार आहेत.**

हा महोत्सव १६ ते २० जून या काळात पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी धर्मपरायण सुंदरसाथजींना निमंत्रण देण्यात आले आहे.सद्गुरु परमहंस श्री कृष्ण प्रणामी मन्दिर सोनगीर धामचा वार्षिक महोत्सव यावर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या शुभप्रसंगी श्रीमत्तारतम वाणीचे साप्ताहिक पारायण, सत्संग आणि भजनांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आद्य जागनीपीठ श्री ५ महामंगलपुरीधाम, सुरत येथील जगद्गुरु आचार्य श्री १०८ सूर्यनारायणदासजी महाराज आणि देशभरातून प्रणामी धर्माचे संत-गुरुजन, विद्वान, संगीतकार आणि सुंदरसाथ उपस्थित राहणार आहेत. सर्व सुंदरसाथजनांना कुटुंबीयांसहित आणि मित्रमंडळींसोबत या महोत्सवात सहभागी होण्याचे आणि सेवा, सुमिरन आणि सत्संगाच्या त्रिवेणीत स्नान करून आध्यात्मिक लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शब्दकोडे क्रमांक : २१८३



आडवे शब्द : १.राज कपूर यांचा एक अजरामर सिनेमा ४.अशक्त ७.वाळू ८.विनोद खन्ना,मिनाक्षी शेषाद्री यांचा एक सिनेमा ९.जखमेवर लावावयाचे एक स्निग्ध औषध ११.हिंदीत-कुलूप १४.वळसा १५.साधना,शशी कपूर यांचा एक सिनेमा १९.फळाचे तुकडे २१.विषम नसलेला २२.स्वच्छ २३.सुर्य २४.हिंदीत-आम्ही २५.पिता २७.सावली २८.हिंदीत-उपाय २९.वाढ ३१.बाराचा संच ३३.धर्मेंद्र, जितेंद्र यांचा एक सिनेमा ३५.एक मंगल वादय ३६.सोने ३८.भुगा ३९.पैसे मिळवणारा ४४.वारा ४५.एक पालेभाजी ४६.वफादारी ४८.हिस्सा ४९.लहान टेकडी ५०.एक चर्म वाद्य

उभे शब्द : १.राजेश खन्ना, तनुजा यांचा एक सिनेमा २.अभिनेत्री रेवतीचा एक भयपट ३.अशोक कुमार यांचा एक भयपट ४.कंबर ५.काम ६.ताकद ८.हगवण ९.पाठीचा कणा १०.मला शहाजहानने बनवलेली एक जगप्रसिद्ध वास्तू १२.वल्कल १३.ब्राझीलचा एक जगप्रसिद्ध फुटबॉल पटू १६.उठ-विरुदध १७.सुमन १८.अक्षय कुमार, दिपक तिजोरी यांचा एक सिनेमा २०.दैना २५.माराचे वण २६.रेघ २८.हत्या २९.वेगात असलेला ३०.नम्र ३२.मस्त ३४.डोक्याचा टोप ३७.एखादयाची केलेली हुबेहुब नक्कल ३८.व्दार ४०.वानर ४१.मोठ्या भावास आपण आदराने हाक मारतो ४२.प्रजा ४३.छातीठोकपणे सांगितलेला अधिकार ४५.पलीकडे ४७.मराठी सालातील अकरावा महीना

**शब्दकोडे क्रमांक : २१८२ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घ | रं | दा | ज | | को | य | ला | | ब | जा | ज |
| न | | द | र | व | ळ | | ड | र | का | ळी | |
| | तु | ला | | प | सा | रा | | ब | ल | | दे |
| सी | ता | | शा | न | | म | क | डी | | स | व |
| | री | या | ल | | अं | ग | ण | | ब | ल | मा |
| पो | | क | | बे | | ढ | | मा | | ग | णू |
| ट | का | | मा | ल | क | | ब | द | ला | | स |
| गी | | का | | न | र | म | | क | व | डी | |
| | ख | त | रा | | म | | सा | | णी | | तु |
| वि | टा | ळ | | को | | क | ठ | डा | | ख | रा |
| रा | व | | ख | र | व | स | | ग | रा | डा | |
| ना | | मे | वा | ड | | म | स्त | | ज | वा | ब |






## गळफास घेऊन इसमाचा मृत्यू

**धुळे, दि.१२- शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचामधील गणेश नगरातील पस्तीस वर्षीय इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.**

नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, गणेश नगरातील ईश्वर भटेसिंग गिरासे (वय ३५) हे राहत्या घरात बेडरूममध्ये लोखंडी कडीला बेडशिटने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने खाली उतरवून दोंडाईचातील उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉ.अवनी पाटील यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी दोंडाईचा पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.














## पान १ वरुन

### अहमदाबादेत प्रवाशी विमान कोसळले

कर्मचाऱ्यांसह २३० प्रवाशांचा समावेश होता. प्रवाशांमध्ये भारताच्या १६९ नागरिकांचा समावेश होता. तर ५१ ब्रिटीश, ७ पोर्तूगीज, एक कॅनेडियन नागरिकाचा समावेश होता. तसेच २ नवजात बालक, ११ लहान मुले या विमानातून प्रवास करत असल्याची माहिती पुढे आली आहे. या अपघातग्रस्त विमानातील संपूर्ण २३० प्रवाशांची यादी आता समोर आली आहे.

**नेत्यांच्या संवेदना**

दरम्यान, या दुर्घटनेचे वृत्त समोर येताच राजकीय क्षेत्रातून याबद्दल संवेदनशील प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, गृहमंत्री अमित शाह यांनी या दुर्घटनेवर शोक व्यक्त केला आहे. अहमदाबाद येथील दुर्घटनेने आपल्याला धक्का बसला असून अति दुःख झाले आहे. हे दुःख शब्दात सांगता येणार नाही. या दुःखाच्या क्षणी या घटनेने प्रभावित झालेल्या प्रत्येकाबाबत माझ्या संवेदना व्यक्त करतो. बाधितांना मदत करण्यासाठी काम करत असलेले मंत्री आणि अधिकारी यांच्या संपर्कात आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी एक्सवर केलेल्या त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहे.

अहमदाबाद येथील एअर इंडिया विमान अपघात हा हृदयद्रावक आहे. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना होत असलेल्या वेदना आणि त्यांची चिंता याची कल्पना करता येणार नाही. प्रशासनाकडून ताबडतोब बचाव आणि मदत करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक जीव महत्त्वाचा असून प्रत्येक सेकंद महत्त्वपूर्ण आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्तांना शक्य ती मदत करावी, असे सांगितल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. अहमदाबाद येथील विमान अपघाताची वेदना शब्दांत व्यक्त करता येण्याच्या पलीकडची आहे. आपत्ती प्रतिसाद दलांना तातडीने दुर्घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गृहमंत्री हर्ष संघवी आणि अहमदाबादचे पोलीस आयुक्त यांच्याशी संवाद साधला, असे देशाचे गृहमंत्री अमित शाह म्हणाले.

### पुण्यासाठी रोज एसी कोचसह रेल्वेसेवा

आ.अग्रवाल म्हणाले, की धुळे शहरासह जिल्ह्यातील व्यापारी, विद्यार्थी व नागरिक रोज मोठ्या संख्येने पुण्या-मुंबईकडे ये-जा करत असतात. शिवाय धुळ्यासह खान्देशातील हजारो नोकरदार पुणे- मुंबईत वास्तव्यास आहेत. सध्या धुळ्याहून सकाळी धुळे-दादर रेल्वेसेवा सुरू आहे. मात्र, पुण्यासाठी कुठलीही रेल्वेसेवा नाही. रात्रीच्या वेळी मुंबई व पुण्याकडे जाण्यासाठी रेल्वेची सोय नसल्याने प्रवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर धुळे स्थानकातून मुंबई व पुणे या दोन्ही महानगरांसाठी रोज रात्री एसी कोचसह तातडीने रेल्वे सुरू करण्याची गरज व्यक्त केली. तसेच मुंबई व पुणे येथूनही धुळ्यासाठी रोज रात्री एसी कोचसह रेल्वे सुरू झाल्यास हजारो प्रवाशांची मोठी सोय होणार असून, याद्वारे रेल्वेलाही मोठे उत्पन्न मिळू शकेल. यामुळे या दोन्ही शहरांसाठी तातडीने रेल्वे सुरू करण्याची आग्रही मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

लवकरात लवकर कार्यवाही : मीना

आमदार अग्रवाल यांच्या मुंबई व पुण्यासाठी रोज रात्री एसी कोचसह रेल्वे सुरू करण्याच्या मागणीबाबत मीना यांनी लवकरात लवकर कार्यवाही करण्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, सद्यःस्थितीत मुंबई व पुणे या दोन्ही रेल्वेस्थानकांच्या फलाट वाढीचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होताच मुंबई व पुण्यासाठी धुळे येथून व पुणे-मुंबईहून धुळ्यासाठी रोज रात्री एसी कोचसह रेल्वे सुरू करण्यात येईल.

मालेगाव रोड क्रॉसिंगवर पूल करा

आ.अग्रवाल यांनी धुळे शहरासाठीच्य रेल्वेशी संबंधित आणखी एका महत्त्वाच्या विषयावर रेल्वे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. ते म्हणाले, की मुंबई-आग्रा महामार्गावर मालेगाव रोडवर एली-सी या ठिकाणी धुळ्यात प्रवेश करताना रेल्वे क्रॉसिंग आहे. या महामार्गावरून वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे रेल्वे ये-जा करताना गेट बंद ठेवावे लागत असल्याने वाहतुकीची मोठी कोंडी होते. यात वाहनधारकांचा बराच वेळ वाया जातो. तसेच दुर्दैवाने अपघातांची शक्यताही निर्माण होते. यामुळे या रेल्वे क्रॉसिंगवर तातडीने उड्डाणपूल उभारावा, जेणेकरून महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहून अपघातही होणार नाहीत. या बाबत तातडीने सर्वेक्षण करून पुलाला मंजुरी देण्याची ग्वाहीही सेंट्रल रेल्वेचे सरव्यवस्थापक मीना यांनी आमदार अग्रवाल यांना दिली.

### निवडणूक प्रक्रियेस प्रशासनाकडून प्रारंभ

केली जाईल. त्यानुसार प्रभागाची प्रारूप रचना स्पष्ट होईल. यानंतर १७ आणि १८ जुनला जनगणनेची माहिती तपासण्याचे काम होईल. वेळापत्रकानुसार १९ ते २३ जुन या कालावधीत प्रभाग रचनेच्या प्रत्यक्ष स्थळाची पाहणी होईल. गुगल मॅपवर २४ ते २६ जुन या काळात प्रभागाचे नकाशे तयार केले जातील. नंतर २७ ते ३० जुन या कालावधीत नकाशावर निश्चित केलेल्या प्रभागाच्या हद्दीची प्रत्यक्षात जावुन तपासणी केली जाईल. ही सर्व प्रक्रीया पार पाडल्यानंतर १ ते ३ जुलै या कालावधीत प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुदयावर समितीतर्फे स्वाक्ष-या होतील. महापालिकेकडून ४ ते ८ जुलै या कालावधीत प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणुक आयोगास पाठविला जाईल. त्यानंतर प्राधीकृत केलेला अधिकारी प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता देईल. यानंतर १५ ते २१ जुलै या कालावधीत महापालिका आयुक्त प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द करतील आणि त्यावर हरकती मागवतील. प्रारूप प्रभाग रचनेवर दाखल झालेल्या हरकतींवर २२ ते ३१ जुलै या कालावधीत जिल्हाधिकारी सुनावणी घेतील. सुनावणीनंतर हरकती आणि सुचनांवरील शिफारस लक्षात घेवुन महापालिका आयुक्त १ ते ७ ऑगस्ट या काळात अंतिम केलेली प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणुक आयोगाकडे पाठवेल. राज्य निवडणुक आयुक्तांनी मान्यता दिलेली प्रभाग रचना महापालिका आयुक्तांकडे येईल. त्यानंतर २२ ते १ सप्टेंबर या काळात महापालिकेच्या स्तरावर आयोगाकडून आलेली अंतिम प्रभाग रचना अधिसुचनाव्दारे प्रसिध्द केली जाईल, असे आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी सांगितले.

### अतिसाराची लागण झालेले रूग्ण वाढलेत

ज्या भागात अतिसाराची लागण झाली आहे. त्या भागात आरोग्य विभागाच्या कर्मचा-यांना पाठवुन आरोग्य तपासणी केली जात आहे. नागरीकांना प्रतिबंधात्क उपाय आणि उपचारांविषयी माहिती दिली जात आहे. येत्या काही दिवसात परिस्थिती नियंत्रणात येईल. नागरीकांनी आरोग्य विभागाच्या सुचनांचे पालक करावे, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य अधिकारी संपदा कुलकर्णी यांनी केले आहे.

### दरोडेखोरांची सुपरवायझरला मारहाण

तलवार सदृष्य हत्यारे होते. त्याच शस्त्राचा धाक दाखवून ऑईल लुटण्याचा प्रयतक केला. तसेच विरोध करणारे सुपरवायझर पंकज रामजी वासवान ४० यांना मात्र दरोडेखोरांशी काही मिनिटे सामना करावा लागला. त्यांच्या खिशात केवळ तीनशे पन्नास रुपये होते. ते या दरोडेखोरांनी लुटले.त्यानंतर ते पसार झाले. याप्रकरणी पासवान यांनी फिर्याद दिल्याने दरोडेखोरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपमानास्पद वागणुकीची तक्रार

घेण्यात आलेली नाही. गेल्या महिन्यात एका डॉक्टराने कारण नसतांना गर्भवती महिलेस आणि तिच्या नातेवाईकांना शिवीगाळ केली. ग्रामीण भागातील महिलांना धमकावुन काही कागदपत्रांवर स्वाक्ष-या घेतल्या जातात. हे सर्व प्रकार रूग्णालयातील सीसीटीव्ही कॅमे-यात चित्रीत झाले आहे. हे चित्रीकरण सुरक्षित करावे. चित्रीकरणाची पाहणी करून दोषी डॉक्टर आणि कर्मचा-यांवर सक्त कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम ओबीसी, एसबीसी संघर्ष समितीने केली आहे.

## भारतातील आतापर्यंतचे १० सर्वात भयंकर विमान अपघात

अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळले आहे. अपघातस्थळावरून आकाशात काळा धूर निघताना दिसत होता. अहमदाबाद विमानतळावरून विमानाने उड्डाण घेतल्यानंतर लगेचच हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. तथापि, यामध्ये किती लोकांचा मृत्यू झाला आहे हे उघड झालेले नाही. दरम्यान भारतातील आतापर्यंतच्या १० मोठ्या अपघातांबद्दल जाणून घेऊया.

**भारतात पहिला विमान अपघात १९३८ मध्ये**

भारतात पहिला विमान अपघात दातिया येथे ७ मार्च १९३८ मध्ये झाला. यात ७ जणांचा मृत्यू झाला. एअर फ्रान्सचे पोटेझ ६२ विमान मध्य प्रदेशातील दातियाजवळ कोसळले. प्रवासी विमानात आग लागली. हे विमान व्हिएतनाममधील हनोईहून फ्रान्समधील पॅरिसला जात होते. जेव्हा हा अपघात झाला तेव्हा हे विमान प्रयागराजहून जोधपूरला जात होते. या घटनेत तीन क्रू मेंबर्स आणि चार प्रवाशांचा मृत्यू झाला.

**टाटा नॅशनल एअरलाइन्सचा अपघात**

१४ ऑगस्ट १९४३ ला लोणावळ्यात टाटा नॅशनल एअरलाइन्सचा अपघात झाला. टाटा नॅशनल एअरलाइन्सचे स्टिन्सन मॉडेलचे प्रवासी विमान महाराष्ट्रातील लोणावळा येथे डोंगरांवर आदळले. ते कोलंबोहून कराचीला जात होते.

**घाटकोपर विमान अपघात**

१२ जुलै १९४९ घाटकोपर विमान अपघात घडला. यात ४५ जण दगावले. इंडोनेशियातील जकार्ताहून नेदरलँड्समधील ॲमस्टरडॅमला जाणारे लॉकहीड कॉन्स्टेलेशन विमान मुंबईतील घाटकोपरजवळ खराब हवामानात उतरण्याच्या प्रयतकात कोसळले. या अपघातात ३५ प्रवासी आणि १० क्रू मेंबर्सचा मृत्यू झाला. या अपघाताचे कारण वैमानिकाची चूक असल्याचे सांगण्यात आले. या अपघातात अमेरिकन पत्रकार एच.आर. निकरबॉकर यांचा मृत्यू झाला.



**अलितालिया फ्लाइट-७७१ अपघात**

७ जुलै १९६२ रोजी जुन्नरमध्ये अलितालिया फ्लाइट ७७१ चा अपघात झाला. यात ९४ जणांचा मृत्यू झाला. ऑस्ट्रेलियातील सिडनीहून रोम, इटली येथे जाणारे विमान मुंबईपासून सुमारे ८४ किमी अंतरावर मार्गावरून फिरल्यानंतर एका लहान टेकडीला धडकले.

**एअर इंडिया फ्लाइट ८५५ (१९७८):**

१ जानेवारी १९७८ रोजी एअर इंडियाचे बोईंग ७४७ फ्लाइट ८५५ मुंबईजवळ अरबी समुद्रात कोसळले. टेकऑफ केल्यानंतर काही मिनिटांतच हा अपघात झाला. त्यात सर्व २१३ प्रवासी आणि कर्मचारी होते.

**एअर इंडिया फ्लाइट १८२ - कनिष्क विमान अपघात (१९८५):**

२३ जून १९८५ रोजी एअर इंडिया फ्लाइट १८२ आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ अटलांटिक महासागरात बॉम्बस्फोटात उडून गेले. हा खलिस्तान समर्थकांनी केलेला दहशतवादी हल्ला होता. यामध्ये ३२९ लोकांचा मृत्यू झाला, त्यापैकी बहुतेक भारतीय वंशाचे कॅनेडियन नागरिक होते. हा भारतातील सर्वात प्राणघातक विमान अपघात मानला जातो.

**इंडियन एअरलाइन्स फ्लाइट ६०५ (१९९०):**

१४ फेब्रुवारी १९९० रोजी, बंगळुरूमध्ये एअरबस ए३२० विमान लँडिंग करताना धावपट्टीवरून घसरले आणि शेतात पडले आणि आग लागली. पायलटच्या चुकीमुळे आणि तांत्रिक बिघाडामुळे ही दुर्घटना घडली. यामध्ये ९२ जणांचा मृत्यू झाला.

**एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइट ८१२ (२०१०):**

२२ मे २०१० रोजी, दुबईहून मंगळुरूला परतणारे एअर इंडिया एक्सप्रेस बोईंग ७३७-८०० विमान लँडिंग दरम्यान धावपट्टीवरून घसरले आणि कोसळले. या अपघातात १५८ जणांचा मृत्यू झाला. पायलटचा थकवा आणि धावपट्टीचा अतिरेक ही याची मुख्य कारणे होती.

**एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइट १३४४ (२०२०):**

७ ऑगस्ट २०२० रोजी दुबईहून केरळमधील कोझिकोड विमानतळावर परतणारे विमान मुसळधार पावसात उतरताना धावपट्टीवरून घसरले आणि त्याचे दोन भाग झाले. या अपघातात २१ जणांचा मृत्यू झाला. हे विमान वंदे भारत मिशन अंतर्गत चालवले जात होते.

**अहमदाबाद एअर इंडिया विमान अपघात**

अहमदाबाद विमानतळाजवळ एअर इंडियाचे एक प्रवासी विमान कोसळले. हे विमान लंडनला जात होते. या विमानात क्रू मेंबर्ससह २४२ लोक होते. मिळालेल्या माहितीनुसार, हे एअर इंडियाचे एआय १७१ फ्लाइट होते. हे विमान अहमदाबाद विमानतळावरून दुपारी १.३८ वाजता लंडनसाठी उड्डाण करत होते. अपघातग्रस्त झालेले विमान बोईंग कंपनीचे (७८७-८ ड्रीमलायनर) होते. हे बोईंग विमान जगभरातील अनेक एअरलाइन्सद्वारे चालवले जाते. या विमानाची किंमत सुमारे २४८ दशलक्ष डॉलर्स इतकी आहे.

## मोदींच्या नेतृत्वात देश प्रगतीपथावर : ना.सावकारे



**धुळे, दि.१२- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीपथावर आहे. मोदी यांच्या प्रभावशाली ११ वर्षाच्या कामामुळे संपुर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. देशातील १४० कोटी लोकांच्या कल्याणासाठी पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारने अनेक कल्याणकारी योजना आणल्या आहेत. त्यामुळे येणा-या काळात सर्वसामान्य माणसाचा विकास झालेला असेल, असे मत राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी व्यक्त केले. मंत्री सावकारे यांनी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयात प्रसार माध्यमांशी संवाद साधला.**

मंत्री संजय सावकारे गुरूवारी धुळे दौऱ्यावर आले. त्यावेळी त्यांनी आमदार अनुप अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयात माध्यमांशी संवाद साधला. मंत्री सावरकारे म्हणाले, काँग्रेसने ६० ते ६२ वर्ष देशाचा कारभार पाहिला. पण काळात सामान्यांचा विकास झाला नसुन पिळवणुक झाली आहे. नागरीकांच्या मुलभुत गरजा आणि सोयी-सुविधांचा काँग्रेसने विचारच केला नाही. अकरा वर्षांपुर्वी केंद्रात मोदी यांच्या नेतृत्वात भाजपचे सरकार आले. मोदी यांनी ११ वर्षात अनेक महत्वपुर्ण निर्णय घेतले. अलिकडेच राबविलेल्या ऑपरेशन सिंदुरमुळे भारताने जगाचे लक्ष वेधले. मोदी यांच्या नेतृत्वात काशी-विश्वनाथ, प्रभु रामचंद्र यांच्या मंदिरांची निर्मिती झाली. गरीबीचे उच्छाटन करण्यासाठी मोदी यांनी अनेक कल्याणकारी योजना आणल्या. त्यात गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्यमान भारत, किसान सन्मान योजना अशा योजनांमधुन १४० कोटी भारतीयांच्या अपेक्षांची पुतर्ता होत आहे, असेही मंत्री सावकारे यांनी सांगितले. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ओमप्रकाश अग्रवाल यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळाला ११ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल साकारण्यात आलेल्या प्रदर्शनाचे मंत्री सावकारे यांच्या हस्ते उदघाटन झाले.

## गडचिरोलीत शेतकरी न्याय पदयात्रा

(पान १ वरुन) खदानीला विरोध करू नये म्हणून हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडून खदानीला विरोध करणार नाही, मोर्चात सहभागी होणार नाही असे लिहून घेतले जाते.दरम्यान, आज दुपारी अहमदाबाद येथून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान कोसळून भीषण अपघात झाला आहे. या विमानात २४२ प्रवासी व क्रू मेंबर होते. ही घटना अत्यंत दुःखद व धक्कादायक आहे. संपूर्ण देश शोकमग्न आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने आजपासून पुढचे दोन दिवस राज्यभर आयोजित केलेले मशाल मोर्चे स्थगित करण्याची घोषणा सपकाळ यांनी केली.

**२७ वे पुण्यस्मरण**



**कै. पंचानन रामकृष्ण परमार (अनरद)**


(जन्म- ३१/७/१९८६ मृत्यु- १३/६/१९९८)

नाही विसावा तव आठवणींना !
विसरु कसा? तुझ्या त्या काळ - वेळेला!!

✻ शोकाकुल ✻

आर.जी.गिरासे, वडील (शहादा)
सौ.जसवंतकौर रामकृष्ण परमार आई (शहादा)
योगेंद्रसिंह परमार, भाऊ (पुणे)
सौ.आरती जितेंद्र राऊळ, बहिण (करवंद, शिरपूर)

**समस्त परमार परिवार, शिंदखेडा.**



**विनम्र अभिवादन!**

खान्देश भुषण
**स्व.दाजीसाहेब रोहिदासजी पाटील**
माजी कृषी व पाटबंधारे मंत्री, महाराष्ट्र राज्य
यांना जयंतीनिमित्त
**विनम्र अभिवादन!**

: अभिवादक :

युवराज आबा करनकाळ, सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
मुजफ्फर हुसेन राजा भैय्या, मा.नगरसेवक, धुळे महापालिका, धुळे

**पाहिजेत**
साऊथ इंडियन रेस्टॉरंटमध्ये काम करण्यासाठी होतकरु मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल.
पात्रता : १० व १२ वी पास
सिद्धीविनायक फूडस्
पत्ता : दत्त मंदिर चौक, देवपूर, धुळे
9822297970

**कन्स्ट्रशक्शन साईट सुपरवायझर पाहिजे**
धुळे येथे बिल्डींग साईटसाठी डिप्लोमा/B.E. सिविल शिक्षण झालेले व साईटचा कमीत कमी ०३ वर्ष अनुभव असलेला साईट सुपरवायझर हवा आहे.
-: संपर्क :-
7709409937

**पाहिजेत**
पेस्ट कंट्रोल कंपनीत खालील पदे भरणे आहेत
१) Accountant १ जागा
२) Worker - २ जागा
योग्य उमेदवारास योग्य पगार मिळेल.
+ PF +S.I. + T.A.
-: संपर्क :-
7972026646

**पाहिजेत**
१) मार्केटींग व बुकींगसाठी बाहेरगावी जाणारा मुलगा पाहिजे.
२) सेल्समनसाठी दुकानावर मुलगा पाहिजे.
फुल टाईम.
कमीत कमी १० वी पास
संजय वॉच कं.
जेलरोड, शॉप नं.१, मधुर शॉपींग सेंटर, धुळे
भेटण्याची वेळ : ४ ते ६
9822936890

**घर विकणे आहे**
प्लॉट नं.९, भरत नगर, ११५० बांधकाम लोडबेरींग प्लॉट साईज ३६८५ स्क्वे. फूट. योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
9422775491

**पाहिजेत**
वेटर- २
हेल्पर- २
-: संपर्क :-
हॉटेल शेरे पंजाब
आग्रारोड, धुळे

**पाहिजे**
स्वयंपाक घरातील कामासाठी कोर्टापासून जवळपास राहणारी बाई पाहिजे.
-: संपर्क :-
7276158096

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑफिस बॉय कम ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
भावसार ॲन्ड असोसिएटस्
देवूपर तलाठी ऑफिस समोर, आग्रारोड, धुळे
9822051975
7588519075

**- पाहिजेत -**
● नर्स/स्टाफ
● RMO
● Computer Operator
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**ड्रायव्हर पाहिजे**
स्कॉर्पिओची माहिती असणारा निर्व्यसनी व अनुभवी ड्रायव्हर लावणे आहे
-: संपर्क :-
मे.चंद्रकांत ॲण्ड कंपनी
किसनबत्ती खुंट, ग.नं.५, धुळे
9422289809

**पाहिजेत**
रेडिमेड फर्निचर दुकानाकरिता माणूस हेल्पर पाहिजे. अनुभवी असल्यास प्राधान्य.
फर्निचर फर्स्ट
दुर्गा पाईप समोर, तळघरात, जेबीरोड, धुळे
9422233994
9420257475

**पाहिजेत**
१) दुकान कामाकरिता अनुभवी हुशार माणूस-२ जागा
२) अकौन्ट कामाकरिता अनुभवी माणूस- १ जागा
7588517770
9850815243

**प्लॉट विकणे आहे**
केदार सिटी, नगाव बारी 2200 sq.ft. पश्चिम मुखी गार्डन लगत, अतुल्य तारा, पोतदार शाळेसमोर 2200 sq.ft. 2 Plot
-: संपर्क :-
9404576771
8459225095

**कुलिंग इंडिया की पहचान**
Symphony
Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स'



आता खरेदी करा कूलर 0% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०